सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

*** महानगरपालिका हद्दितील नागरीकांना नविन पाणी कनेक्शन जोडण्यासाठी ~~ऑनलाईन पध्दतीने मागणी अर्जे स्विकारणे~~***
अनुज्ञप्तीधारक नळ कारागीर (प्लंबर/फिटर)नोंदणी करण्याकरिता जाहिरात

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील ग्राहकाने मागणी केलेल्या भागातील मनपाच्या वितरण व्यवस्थेस अनुसरुन प्रस्तावित नळ जोडणीची सद्य:स्थिती, अस्तित्वातील वितरण व्यवस्थेचा व्यास इ.बाबी दर्शविणारा नकाशा क्षेत्रीय पाहणी करुन तयार करणे , मनपाने विहित केलेल्या नमुन्यात व योग्य कागदपत्रांसह अर्ज सादर करण्यास मदत करणे, नळ / ड्रेनेज जोडणी आकार,सुरक्षा अनामत इ. बाबत ग्राहकांस माहिती देणे, नळ/ड्रेनेज जोडणीस मंजुरी मिळाल्यानंतर मनपाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार प्रत्यक्षात नळ / ड्रेनेज जोडणी करणे इ. कामे नळ कारागीरास करावी लागतात.

सद्य:स्थितीत अनुज्ञप्तीधारक नळ कारागीरांची संख्या अपुरी असल्याने नवीन अनुज्ञप्तीद्वारे जादा नळ कारागीरांची नोंदणी करण्यात येणार आहे. पाणी पुरवठा व ड्रेनेज जोडण्या,दुरुस्तांसाठी अनुज्ञप्तीधारक नळ कारागीर म्हणुन नोंदणी होण्याकरिता खालील प्रमाणे अर्हता आवश्यक राहील.(सोबत अर्जाचा नमुना)

अर्हता : कमीत कमी आय.टी.आय.संस्थेतील संबंधित शाखेतील (फिटर/प्लंबर)अर्हता अथवा शासनाने अधिकृत केलेला कोणताही कोर्स.स्थापत्य अभियांत्रिकी पदवी/ पदविकाधारक व तसेच महानगरपालिकेकडे बांधकाम विभागाकडे स्थापत्य कामासाठी नोंदणी असलेले ठेकेदार सुध्दा अनुज्ञप्तीधारक नळ कारागीर म्हणुन काम करण्यास पात्र राहतील.

अर्ज सादर करण्याचे ठिकाणी : मुख्यबारनिशी, महापालिका मुख्यालय,सांगली ४१६४१६

अर्ज सादर करण्याचा शेवटचा दिनांक : दि.२५/७/२०२२

(शुभम गुप्ता) भा.प्र.से.
आयुक्त तथा प्रशासक,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

01C